शासकीय/ महापालिका वैद्यकीय महाविद्यालयातून अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना बंधपत्रित सेवेसंदर्भात सुधारित अटी लागू करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

**शासन शुध्दीपत्रक क्रमांक एमईडी १०१७/प्र.क्र.१७१/१७/शिक्षण-२**

गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल,

लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१

**दिनांक : २४ नोव्हेंबर, २०१७**

**संदर्भ** :

१. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्र.एमईडी-१००७/ प्र.क्र.४९०/०७ / शिक्षण-२, दिनांक ०८.०२.२००८
२. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्र.एमईडी-१०१३/ प्र.क्र.१०१/१३/ शिक्षण-२, दिनांक ३१.०१.२०१४
३. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्र.एमईडी-१०१७/ प्र.क्र.१७१/१७/ शिक्षण-२, दिनांक १२.१०.२०१७

**शासन शुध्दीपत्रक-:**

संदर्भाधीन क्रमांक ३ वरील दिनांक १२.१०.२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद १ (ड) सुधारण्यात येत असून सदर परिच्छेद पुढीलप्रमाणे वाचण्यात यावा:-

**"ड. सदर धोरण हे वैद्यकीय व दंत पदव्युत्तर आणि अतिविशेषोपचार अभ्यासक्रम यांच्या शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासूनच्या प्रवेशापासून लागू होईल. त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या अथवा अतिविशेषोपचार अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी इच्छुक उमेदवारांनी प्रवेशापुर्वीच शासनाची बंधपत्रित सेवा पूर्ण करणे आवश्यक राहील."**

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०१७११२३१६४४०६४११३ असा आहे. हा शासननिर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Surendra Pralhad Chankar

Digitally signed by Surendra Pralhad Chankar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=da74ced4daa59e5121be348655e71412ea68827bae27cd8d480eb3963ff77726, serialNumber=f0abc250c4d9be2b6b786fa7056a78c0298ba36e78a4582723738fdd3d550d44, cn=Surendra Pralhad Chankar
Date: 2017.11.24 18:02:51 +05'30'

**(सुरेन्द्र प्र.चानकर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

मा. राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राजभवन, मलबार हिल मुंबई.
मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
मा. राज्यमंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
सर्व सह/ उप सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
अधिष्ठाता/ प्राचार्य, सर्व शासकीय व महानगरपालिका वैद्यकीय/ दंत महविद्यालये
निवडनस्ती (शिक्षण-२)

शासकीय/ महापालिका वैद्यकीय महाविद्यालयातून अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना बंधपत्रित सेवेसंदर्भात सुधारित अटी लागू करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक एमईडी १०१७/प्र.क्र.१७१/१७/शिक्षण-२**

गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल,

लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१

**दिनांक : १२ ऑक्टोंबर, २०१७**

**संदर्भ** :
१. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्र.एमईडी-१००७/ प्र.क्र.४९०/०७ / शिक्षण-२, दिनांक ०८.०२.२००८
२. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्र.एमईडी-१०१३/ प्र.क्र.१०१/१३/ शिक्षण-२, दिनांक ३१.०१.२०१४

<u>प्रस्तावना</u> :

राज्यातील शासकीय आणि महापालिका वैद्यकीय/ दंत महाविद्यालयातून वैद्यकीय/ दंत पदवी/ पदव्युत्तर पदविका/ पदव्युत्तर पदवी/ अतिविशेषोपचार अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येक अभ्यासक्रमाकरीता एक वर्ष कालावधीची शासनाची बंधपत्रित सेवा करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे वैद्यकीय सेवा देण्याकरीता शासनास बऱ्याच प्रमाणात वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होतात. तथापि, राज्यातील ग्रामीण, दुर्गम आणि आदिवासी भागामध्ये वैद्यकीय सेवा पुरविण्यास पुरेसे डॉक्टर्स उपलब्ध होत नाहीत. तसेच, अतिविशेषोपचार अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विशेषज्ञांची देखील शासकीय रुग्णालयामध्ये कमतरता आहे. त्यानुषंगाने बंधपत्रित सेवेच्या कालावधी संदर्भात सुधारीत अटी लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय-:**

राज्यातील शासकीय/ महानगरपालिकेच्या वैद्यकीय/ दंत महाविद्यालयातून पदवी, पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदवी व अतिविशेषोपचार अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना खालील अटी/ शर्ती लागू राहतील.

**अ.** शासकीय/ महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयातून एम.बी.बी.एस.अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर करावयाची विहीत कालावधीची शासनाची बंधपत्रित सेवा पूर्ण केल्याशिवाय अशा उमेदवारांना एमडी/ एमएस/ पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता पात्र ठरविण्यात येणार नाही.

**ब.** शासकीय/ महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयातून पदव्युत्तर पदवी/ पदविका अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवाराने विहीत कालावधीची शासनाची बंधपत्रित सेवा पूर्ण केल्याशिवाय अशा उमेदवारांना अतिविशेषोपचार अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता पात्र ठरविण्यात येणार नाही.

**क.** शासकीय/ महापालिका वैद्यकीय महाविद्यालयातून अतिविशेषोपचार अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनाची २ वर्षे कालावधीची बंधपत्रित सेवा पूर्ण करणे बंधनकारक राहील.

**ड.** सदर धोरण हे वैद्यकीय व दंत पदव्युत्तर आणि अतिविशेषोपचार अभ्यासक्रम यांच्या शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासूनच्या प्रवेशापासून लागू होईल. त्यामुळे सन २०१८-१९ मध्ये पदव्युत्तर अथवा अतिविशेषोपचार अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी इच्छुक उमेदवारांनी प्रवेशापुर्वीच शासनाची बंधपत्रित सेवा पूर्ण करणे आवश्यक राहील.

**इ.** उपरोक्त "अ", "ब", "क" आणि "ड" मधील प्रस्तावित बदल वगळता शासकीय/ महापालिका वैद्यकीय महाविद्यालयातून अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या उमेदवारांकरीता बंधपत्रित सेवेसंदर्भातील यापुर्वीच्या इतर अटी व शर्ती तशाच लागू राहतील.

**ई.** तसेच, बंधपत्रित सेवेचे वाटप एमकेसीएल (MKCL) द्वारा तयार करण्यात आलेल्या "Online System" अन्वये करण्यात येईल.

सदर शासननिर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०१७१०१२१५२०२१२९१३ असा आहे. हा शासननिर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Surendra Pralhad Chankar

Digitally signed by Surendra Pralhad Chankar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=da74ced4daa59e5121be348655e71412ea68827bae27cd8d480eb3963ff77726, serialNumber=f0abc250c4d9be2b6b786fa7056a78c0298ba36e78a4582723738fdd3d550d44, cn=Surendra Pralhad Chankar
Date: 2017.10.13 15:59:46 +05'30'

**(सुरेन्द्र प्र.चानकर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

मा. राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राजभवन, मलबार हिल मुंबई.
मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
मा. राज्यमंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
सर्व सह/ उप सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
अधिष्ठाता/ प्राचार्य, सर्व शासकीय व महानगरपालिका वैद्यकीय/ दंत महविद्यालये
निवडनस्ती (शिक्षण-२)